**प्रकल्प प्रवर्तक मे. ग्रीनको एनर्जीज प्रा. लिमिटेड (जीईपीएल), तेलंगणा यांचा नायगाव, वाडी सुतोंड, जंगली कोठा, पळशी, बनोटी, घोरकुंड, गोंदेगांव तालुका-सोयगांव आणि वडोद, तालुका-कन्नड, जिल्हा – छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र येथे प्रस्तावित नायगांव पंप स्टोरेज (साठवण) प्रकल्प २,००० मेगावॅट क्षमतेचा जलविद्युत प्रकल्पाच्या स्थापने संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त -**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. ग्रीनको एनर्जीज प्रा. लिमिटेड (जीईपीएल), तेलंगणा यांचा नायगाव, वाडी सुतोंड, जंगली कोठा, पळशी, बनोटी, घोरकुंड, गोंदेगांव तालुका-सोयगांव आणि वडोद, तालुका-कन्नड, जिल्हा – छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र येथे प्रस्तावित नायगांव पंप स्टोरेज (साठवण) प्रकल्प २,००० मेगावॅट क्षमतेचा जलविद्युत प्रकल्पाच्या स्थापने संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक ०८ नोव्हेंबर, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता वाडी सुतोंड ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, तालुका-सोयगाव, जिल्हा-छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

डॉ. प्रकाश प्र. मुंडे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी श्री जनार्दन विधाते, अपर जिल्हादंडाधिकारी,



Scanned with OKEN Scanner

छत्रपती संभाजीनगर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती, श्री सुजित ढोलम, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ आणि १४ ऑगस्ट, २०१८ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. ग्रीनको एनर्जीज प्रा. लिमिटेड (जीईपीएल), तेलंगणा यांचा नायगाव, वाडी सुतोंड, जंगली कोठा, पळशी, बनोटी, घोरकुंड, गोंदेगांव तालुका-सोयगांव आणि वडोद, तालुका-कन्नड, जिल्हा – छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र येथे प्रस्तावित नायगांव पंप स्टोरेज (साठवण) प्रकल्प



Scanned with OKEN Scanner

२,००० मेगावॅट क्षमतेचा जलविद्युत प्रकल्पाच्या स्थापने संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिनांक २१-०९-२०२३ रोजी अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ए १ (सी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व जलवायू परिवर्तन् मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व जलवायू परिवर्तन् मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर केला व त्यास अर्जास ऑनलाईन मंजूरी दिनांक १६-०१-२०२३ रोजी प्रदान केली.



Scanned with OKEN Scanner

जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास बुधवार , दिनांक ०८ नोव्हेंबर, २०२३ रोजी सकाळी ११. ०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ७१ /२०२३ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी--२३१०११ एफटीएस - ०२२२ दिनांक ११-१०-२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २)महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी —<br>प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>छत्रपती संभाजीनगर | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>छत्रपती संभाजीनगर | - | **आयोजक** |



Scanned with OKEN Scanner

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत ०४-१०-२०२३ रोजी जनसुनावणीबाबत प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व जलवायू परिवर्तन मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,

२) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, छत्रपती संभाजीनगर,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, छत्रपती संभाजीनगर,

५) तहसीलदार,तहसील कार्यालय-सोयगांव, जिल्हा - छत्रपती संभाजीनगर,

६) तहसीलदार, तहसील कार्यालय- कन्नड, तालुका- कन्नड, जिल्हा- छत्रपती संभाजीनगर,



Scanned with OKEN Scanner

७) गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय-सोयगांव, जिल्हा- छत्रपती संभाजीनगर,

८) गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय-कन्नड, जिल्हा- छत्रपती संभाजीनगर,

९) सरपंच/ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय – नायगाव, वाडी सुतोंड, जंगली कोठा, पळशी, बनोटी, घोर्कुद, गोंदेगांव, तालुका- सोयगांव, जिल्हा- छत्रपती संभाजीनगर,

१०) सरपंच/ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय –कन्नड, तालुका- कन्नड, जिल्हा- छत्रपती संभाजीनगर,

११) संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

१२) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

१३) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भूखंड क्रं. ए-४/१, पर्यावरण भवन, लोकपत्रच्या मागे, चिकलठाणा औद्योगिक क्षेत्र, छत्रपती संभाजीनगर,



Scanned with OKEN Scanner

१४) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कार्यालय, रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर,

१५) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भूखंड क्रं. ए-४/१, पर्यावरण भवन, लोकपत्रच्या मागे, चिकलठाणा औद्योगिक क्षेत्र, छत्रपती संभाजीनगर,

१६) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना एक सूचना/आक्षेप प्राप्त झालेली आहे.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी



Scanned with OKEN Scanner

चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, वने व जलवायू परिवर्तन् मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश दिले,

प्रकल्प प्रवर्तक श्री नंदा, कार्यकारी संचालक यांनी प्रकल्पाची ओळख करुन देताना सांगितले की या प्रकल्पास पंप स्टोरेज प्रकल्प म्हटले जाते. या प्रकल्पात उत्पादित वीजेची साठवण करण्यात येते. सौर उर्जेसाठी सूर्याची तर वायू उर्जेसाठी हवेची आवश्यकता असते. येथे उत्पादित वीजेची साठवण करण्यात येते. जेव्हा जरुर असेल, तेव्हा ती वापरता येते. यासाठी दोन जलाशय बांधण्यात येतील. हा प्रकल्प २,००० मेगावॅट असून हा पूर्ण होण्यास चार वर्षे लागतील. या प्रकल्पासाठी गुंतवणूक ९,५०० कोटी रुपयांची आहे.

येथील भौगोलिक स्थितीचा विचार करुन येथे दुसरी कुठलीही योजना येणार नसल्याने आम्ही सदरहू योजना येथे विकसित करण्याचा निर्णय घेतला. सदरहू प्रकल्पामुळे परिसरात रोजगाराचा संधी प्राप्त होईल, तर अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

प्रकल्प अधिकारी यांनी सादरीकरण मराठीत केले. सादरीकरणात पर्यावरण व्यवस्थापन योजनेची माहिती देण्यात आली.



Scanned with OKEN Scanner

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर श्री रविंद्र गरुड, राहणार-वाडी सुतोंड, तालुका-सोयगाव यांनी सादरीकरणातील पर्यावरण प्रभाव मुल्यांकनची स्लाईड परत वाचण्याची विनंती केली. प्रकल्प प्रवर्तकांनी ती परत वाचून दाखविली,

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, विचार, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. त्यांनी उपस्थितांना विनती केली की सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम संपूर्ण नाव व गाव सांगण्यात यावे. आयोजक यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक हे उपस्थित प्रश्नांना एकत्रित उत्तरे देतील

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री रविंद्र गरुड, राहणार-वाडी सुतोंड, तालुका-सोयगाव, जिल्हा — छत्रपती संभाजीनगर:-**

या प्रकल्पासाठी ८००-१,००० एकर जमिन ही अधिग्रहित करण्यात येणार आहे. त्यामध्ये वनविभागाची सुमारे ८०० एकर जमिन अधिग्रहित करण्यात येणार आहे. त्या वनविभागाच्या ८०० एकर जमिनीवरिल जैव-वैविधता ही खूप वर्षे जोपासलेली जैव-वैविधता आहे. प्रकल्पाच्या. पर्यावरण सल्लागार यांनी सादर केलेला पर्यावरणीय अहवाल हा चुकीचा आहे. तर मी तयार केलेला पर्यावरणीय अहवालात सर्व पर्यावरण आघात, जैव-वैविधता याबाबत सविस्तर माहिती आहे. या प्रकल्पामुळे पर्यावरणाचा -हास होणार आहे. प्रकल्पामुळे परिसरातील उष्णता ही दीडपट ते पाचपट वाढणार आहे. प्रकल्पातील पाण्याचा साठ्याचा गावाला काहीही फायदा होणार नाही. जामपूर हे धरण होते, त्याचे पाणी हे खाली यायचे. त्या पाण्यामुळे येथील



Scanned with OKEN Scanner

शेतक-यांच्या बागायती शेती व्हायच्या. ते पाणी प्रकल्पामुळे येणार नाही. त्यामुळे बागायती शेतीवर परिणाम, विकास थांबेल, मला तीन मुद्दे मांडावयाचे आहेत

अ) या नायगाव गावाचे लोक आधिच भूमीहिन व अल्पभूधारक आहेत. शेतीचे क्षेत्र कमी असल्याने मजूरांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. जर जमिनी गेल्या तर पोटापाण्याचा प्रश्न निर्माण होतो.

आ) शेतीवर अवलंबून असणारे शेतकरी व मजूर यांनी रोजगार राहणार नाही. तरी आमची विनंती आहे की या प्रकल्पामुळे जो कायमस्वरुपी रोजगार उपलब्ध होईल, तो प्रकल्प बाधित लोकांना देण्यात यावे. गावातील कुशल, अर्धकुशल व अकुशल कामगार हे गावातीलच घेण्यात यावे,

इ) कुठलेही बाहेरुन कामगार न आणता स्थानिक युवकांना प्रशिक्षण देऊन कायमस्वरुपी नोकरी प्रकल्पात देण्यात यावी.

ई) प्रकल्पामुळे गावातील डोंगर नष्ट होऊन तेथील जैव-वैविधता नष्ट होईल. मी गावाचा पर्यावरण अहवाल तयार केलेला असून गावातील डोंगराच्या जैव-वैविधतनेवर जीवन अवलंबून आहे. तरी आम्हां गावक-यांना सामुहिक वनह्क्क मिळवून द्यावा ही विनंती. आमच्या गावाचे स्वामित्व त्या डोंगराबाबत द्यावे. तेथे आम्ही बांबू लागवड, फळबागा लागवड करु, ते गावाचे नियोजन असेल.

उ) वाडी गावातील महसुल विभागाचे गट नं. १७३ व २२६ येथे ६-७ हेक्टर जमिन आहे, ते गायरान क्षेत्र उपलब्ध आहे. १९९७ सालापासून जवळजवळ १५०-२०० कुटुंबे वास्तव्यास आहेत. मा. जिल्हाधिकारी यांनी त्यास गावठाण मंजूर करुन गावातील लोकांना किंवा राहत असलेल्या लोकांना नंबर ८ करण्याचे पत्र द्यावे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की त्यांनी जे मुद्दे उपस्थित केले, त्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. ते शासनाकडे सादर करण्यात येतील.

श्री रविंद्र गरुड यांनी नंतर पुन्हा मुद्दा उपस्थित केला की केंद्र सरकार व महाराष्ट्र शासन हरितपट्टा विकास, वृक्ष लागवड, सामाजीक वनीकरणासाठी पैसा खर्च करते. त्याचा फायदा होत नाही, आणि हे जंगल डोंगर पायथ्याच्या गावांनीच टिकवून ठेवलेले आहे. जर ८०० एकर वनजमिन जात आहे, तर वनविभागाने या प्रकल्पास परवानगी दिली कशी?

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सुरवातीस मी सांगितले की या प्रकल्पास कुठल्याही परवानग्या देण्यात आलेल्या नाहीत. ही जनसुनावणी येथील स्थानिक लोकांच्या भावना समजून घेण्यासाठीच आयोजित करण्यात आलेली आहे. आपण बैठकीत प्रस्तावित प्रकल्पाविषयी ज्या सूचना, आक्षेप नोंदविले, त्याचे स्वागतच आहे. आपल्या आक्षेपांना प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. बैठकीत आपण उपस्थित केलेले मुद्द्यांची नोंद बैठकीच्या इतिवृतात घेण्यात येणार असून ते केंद्र शासनास सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती आपला विचार करुनच पुढील निर्णय घेणार आहे. गावक-यांचे कुठलेही नुकसान होणार नाही.

**२)श्री मंगेश जंझाळ, राहणार-वाडी, तालुका-सोयगाव, जिल्हा-संभाजीनगरः-**

आपल्या क्षेत्रात १२६ प्रजाती फुलांची, १९२ वनस्पती, ४२ प्रजाती पक्षी, ०८ प्रजाती फुलपाखरांच्या आहेत. तर ८३५ हेक्टर वनक्षेत्राची तोड होणार आहे. त्यातील एवढी जैव-वैविधता याबाबत नियोजन कंपनी व शासन कसे लावणार, याबाबत स्पष्टीकरण. त्याचप्रमाणे जंगलाची भरपाई कशाप्रकारे करण्यात येईल, याबाबतची माहिती देण्यात यावी. त्या वनजमिनीचे पुनर्वसन करण्यात येऊन त्याची जबाबदारी कंपनीने घ्यावी.



Scanned with OKEN Scanner

आयोजक यांनी सूचना केली की उद्योगाच्या प्रतिनिधींनी त्याबाबत माहिती सांगावी,

आयोजक यांनी सांगितले की आक्षेपांची नोंद घेण्यात आलेली असून प्रकल्प प्रवर्तक याबाबत योग्य उत्तरे एकत्रित देतील.

**३)श्री भागवत घुले, राहणार-वडोद, तालुका-कन्नड, जिल्हा-छत्रपती संभाजीनगरः-**

प्रकल्पामुळे शेतक-यांच्या जमिनीचे किंवा वनाचे नुकसान होणार आहे, त्याबाबत कंपनीने केलेल्या उपाययोजना, वडोद गावातील जे वने आहेत, तेथे १००-१५० वर्षांची झाडे आहेत. ती झाडे प्रकल्पासाठी तोडली तर त्याची भरपाई कशा प्रकारे करण्यात येईल?

**४)श्री अनिल बागूल, ग्रामपंचायत सदस्य, वाडी सुतोंड, तालुका-सोयगाव, जिल्हा - छत्रपती संभाजीनगरः-**

जी ८०३ हेक्टर जी वनजमिन जाणार आहे, तसेच गोरगरीब लोक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष डोंगरावर अवलंबून आहे. आदिवासा बांधव जल, जमिन, जंगल याच्याशी निगडीत आहेत. मध, डिंक असेल ते पूर्णपणे उध्वस्त होणार आहे. यासाठी काय उपाय योजना करणार, याबाबत कंपनीने उत्तर द्यावे.

**५)श्री विजय पाचोते,**

प्रकल्पासाठी जंगलातील जी जमिन जाणार आहे, तर आमच्या गायी, म्हशी, जनावरे चरायला जातात. त्यांच्याबाबत काय करावे याची सविस्तर माहिती देण्यात यावी. प्रकल्पामुळे ज्या जमिनीचे नुकसान होणार आहे का,, आता जसे पीक येते, तसेच दहा वर्षांनी मिळू शकेल काय? सदरहू माहिती आमच्या मोबाईलवर उपलबध आहे, मात्र आमचे शिक्षण कमी आहे, तरी रचनात्मक चित्रण करुन द्यावे.

**६)श्री वैभव बोरसे, राहणार-वाडी, वाडी सुतोंड, तालुका-सोयगाव, जिल्हा - छत्रपती संभाजीनगरः-**

प्रकल्पामुळे नदीमध्ये Minimum Ecological Flow राखला जाऊ शकेल काय? कारण प्रकल्पात जे पाणी वापरणार आहात, तर ते पाणी नदीत सोडले नाही, तर Minimum Ecological Flow राखला जाऊ शकेल काय? कारण नदीत पाणी सोडल्यानंतरच ते पाझरला, बोअरला येते. स्थानिक शेतक-याच्या पीक उत्पादनावर जो प्रकल्पामुळे जो परिणाम होईल, त्याबाबत स्पष्टीकरण.

**७) श्री भागवत पाटील, राहणार-वाडी गाव, तालुका-सोयगाव, जिल्हा-छत्रपती संभाजीनगरः-**

मला सूचीत करावेसे वाटते की ही जो प्रकल्प आहे, या प्रकल्पात फायदा व तोटा आहे. पर्यावरणावर, जैव-वैविधतनेवर या प्रकल्पामुळे होणार परिणाम व नंतर हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर प्रकल्पामुळे दिल्या जाणा-या विविध सुविधा, वातावरणावरिल परिणाम, काहींनी येथे म्हटले की येथील तापमान ५° ने वाढेल, तर येथील मुख्य पीक कापूस, केळी यावर त्या तापमान वाढीचा काही परिणाम होईल काय? हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर येथील बेरोजगारांना रोजगार मिळेल का? तसेच शासनाने नागिरकांची परवानगी न घेता, दडपशाहीने या प्रकल्पासाठी भूसंपादन करु नये.

पुढील मुद्दा या प्रकल्पास सर्वानुमते परवानगी दिली, तर येथील भविष्यातील मुलांना रोजगार मिळण्याची काळजी शासनाने घ्यायची आहे. जर या प्रकल्पामुळे गावाचा, तालुक्याचा व महाराष्ट्र राज्याचा विकास होत असेल, तर आम्ही पाठिंबा देऊ.

मात्र प्रत्येकाचे आरोग्य हेही महत्वाचे आहे. या प्रकल्पामुळे कुठलीही रोगराई पसरू नये, याची शासनाने दक्षता घ्यावी.



Scanned with OKEN Scanner

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे माहिती दिली की शासनाचा नविन भूसंपादनाचा कायदा आलेला आहे, त्यातील तरतुदींनुसार शेतक-यांना नुकसान भरपाई मिळते. त्यांनी अधिसूचना न काढता भूसंपादन होऊ नये, तर नागरिकांना माहिती न देता अशा अधिसूचना काढल्या जात नाहीत. ब-याच वेळा आपली संमती घेऊनच सर्व प्रक्रिया ही राबविली जाते.

**<u>८) श्री एल्लाजी देवबा साबळे, गाव-बोरमाळ तांडा, जंगली कोठा, तालुका-सोयगाव, जिल्हा-छत्रपती संभाजीनगरः-</u>**

माझे असे म्हणणे आहे की ज्यांनी हा प्रकल्प सुरु करण्याचे नियोजन केले, त्यांनी गावागावात जाऊन प्रकल्पाविषयी जागृती निर्माण करावी. कारण जेव्हा येथील स्थानिकांना जमिन प्रकल्पासाठी जाणार हे कळल्यानंतर प्रत्येकजण हा टेन्शनमध्ये आहे. लोक भयभीत झालेली आहेत. जमिन गेली तर पुढच्या पिढीचे काय हा प्रश्न पडलेला आहे. तरी येथे काहींनी मुद्दे उपस्थित केले की मुलाबाळांचा विचार करुन प्रकल्पास सहकार्य केल्यास मुलांना फायदा होणार का, जर जमिनीचा मोबदला मिळणार असेल, तर तो किती व कसा मिळणार याबाबतीत लोकांमध्ये जागृती होणे गरजेचे आहे.

येथे मेंढपाळ, आदिवासी बांधव राहतात. त्यांच्या जीवनावर या प्रकल्पाचा परिणाम होणार आहे.

त्याचप्रमाणे वनविभागाची जमिन लागून आहे, तेथे प्राण्यांचा अधिवास आहे, तर त्यावर दुष्परिणाम होऊ नये याबाबत विशेष दक्षता घेणे आवश्यक आहे.

या प्रकल्पास हार्दिक शुभेच्छा.

**<u>९) श्री सदाशिव जाधव, राहणार-वडोद गाव, तालुका-कन्नड, जिल्हा – छत्रपती संभाजीनगरः-</u>**

आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयात येऊन निवेदन दिलेले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळासही निवेदन दिलेले आहे. मी प्रकल्पाच्या विरोधात आहे. आमची जमिन मायपोट, सर्व पीके, अन्नधान्य पुरविणारी जमीन आहे, शिवाय ती वनविभागाला खेटून (adjoining) आहे. वन आम्ही चांगल्याप्रकारे ठेवले असुन एकही झाड तोडून दिलेले नाही. आम्ही वनाचे वृदांवन केलेले आहे. आमच्या जमिनीशेजारी ५००-६०० एकर वनांची जमिन असून ती आम्ही सांभाळून ठेवलेली आहे. कुठलेही अतिक्रमण होऊ दिले नाही. कंपनीचे लोक आले, आम्ही माणूसकीच्या नात्याने त्यांना मोजणी करुन दिली.

आमच्या गावाच्यावतीने ठराव मंजूर करुन आपणास निवेदन दिलेले आहे. तरी आपण निर्णय घ्यावा, कारण आमची जमीन सर्व अन्नधान्य पिकविणारी आहे. आमची जमीन बागायती असुन आम्हांला जमीन विकण्याची गरज नाही. मी व आमच्या गावातील बरेच लोक नोकरी, गुलामगिरी करु शकत नाही. मात्र माझ्याकडे रोज कमीतकमी पंधरा लोक काम करत आहेत. आम्ही त्यांना रोजगार दिला. जे शासन करते, तेच आम्ही करत आहोत.

तरी शासनाने याबाबत निर्णय घ्यावा. आम्ही कंपनी मागितली नाही, कारण आम्हांला कंपनीचा आवश्यकता नाही.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपले निवेदन अपर जिल्हादंडाधिकारी यांना सादर करण्यात आलेले असून ते शासनास पोहचविले जाईल.

१०) **<u>श्री समीर रामदास पाटील, राहणार-नायगाव, तालुका-सोयगाव, जिल्हा-छत्रपती संभाजीनगरः-</u>**



Scanned with OKEN Scanner

प्रकल्प हा ज्या नायगाव गावात येत आहे,तेथील रहिवाशी. आमच्या संपूर्ण गावाचा या प्रकल्पास विरोध आहे. मी सुशिक्षित बेरोजगार आहे. माझा व सर्व गावक-यांचा या प्रकल्पास विरोध आहे.

११) **श्री पन्नालाल रखुमाजी घुले, राहणार-वडोद गाव, तालुका-कन्नड, जिल्हा-छत्रपती संभाजीनगर:-**

मी वडोद गावाचा वनसमिती अध्यक्ष आहे. मी गेले २५ वर्षे वनसमिती अध्यक्ष आहे. आमच्या वनात मी एक झाडसुध्दा तोडू दिलेले नाही. आणि कोणाचीही हिंमत नाही. वनस्पतीपासून आपला काय फायदा हे सर्वांनाच माहित आहे. कोण म्हणतो या हायड्रो प्रकल्पापासून पाणी दुषित होत नाही? हायड्रोजन वायू पाण्यात सोडणार तेव्हाच वीज तयार होणार आहे.

१२) **श्री राजमहंमद शेख याकूब, राहणार-**

माझी जमिन या प्रकल्पाच्या पायथ्याशी आहे. या प्रकल्पामुळे माझ्या शेतीला येणारे पाणी बंद होणार, व पर्यावरणाचे नुकसानच होणार आहे. शिवाय येथील तापमानात वाढ होणार आहे. तरी मला न्याय द्यावा ही विनंती.

१३) **श्री अजय कंबरसिग, राहणार-वाडी, तालुका- सोयगाव, जिल्हा-छत्रपती संभाजीनगर:-**

आता येथे सांगितल्याप्रमाणे आमची शेती प्रकल्पाच्या पायथ्याशी आहे. येथे गावातकोणी सांगते की प्रकल्पाचे बांधकाम हे १०० फूट खाली, कोणी सांगते ५० फूट खाली, कोणी सांगते २०० फूट. कोणी सांगते मध्ये काच येणार, नंतर कॉंक्रिटीकरण करण्यात येणार. म्हणजे जो पाण्याचा विसर्ग येतो, तो बंद होईल. आम्हा शेतक-यांना सांगितले जाते की सौर पॅनेलने वाफ तयार करणार आहेत, त्यामुळे त्या उष्णतेने पीकांना त्रास, नुकसानच होणार आहे. आमचे मुख्य पीक कपाशी आहे. लोक म्हणतात दोन फुटापेक्षा उंच कपाशी वाढणार नाही. म्हणजे ते नुकसान होणार, त्याचप्रमाणे पाण्याचा विसर्ग बंद



Scanned with OKEN Scanner

होणार. तरी जिल्हाधिकारी यांनी आमचा प्रश्न सोडवावा व आम्हांला न्याय द्यावा.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सांगितले की आतापर्यच्या चर्चेत स्थानिकांनी असे मुद्दे उपस्थित केले की प्रकल्पामुळे पर्यावरण दुषित होईल, शेतीचे नुकसान होईल, तरी माझी सूचना आहे की प्रकल्पाचा आराखडा कसा असेल,किती फुटांपर्यत बांधकाम करण्यात येईल, बांधकाम किती होईल, कुठल्या गावातील जमिन जाणार आहे, ही सर्व माहिती प्रकल्प बाधित ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध करण्यात यावी, त्यामुळे ती स्थानिकांना, प्रकल्प बाधितांना कळेल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सुरवातीस मी सांगितले की या प्रकल्पास कुठल्याही परवानग्या देण्यात आलेल्या नाहीत. ही जनसुनावणी येथील स्थानिक लोकांच्या भावना समजून घेण्यासाठीच आयोजित करण्यात आलेली आहे. आपण बैठकीत प्रस्तावित प्रकल्पाविषयी ज्या सूचना, आक्षेप नोंदविले, त्याचे स्वागतच आहे. आपल्या आक्षेपांना प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. बैठकीत आपण उपस्थित केलेले मुद्द्यांची नोंद बैठकीच्या इतिवृतात घेण्यात येणार असून ते केंद्र शासनास सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती आपला विचार करुनच पुढील निर्णय घेणार आहे. गावक-यांचे कुठलेची नुकसान होणार नाही.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तक यांनी बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी याबाबत उत्तर देण्याची सूचना केली.

१४) **<u>श्री प्रफुल्ल बोरसे, राहणार-वाडी सुतोंड, तालुका-सोयगाव, जिल्हा—छत्रपती संभाजीनगर-</u>**



Scanned with OKEN Scanner

सदरहू प्रकल्पामुळे स्थानिकांना व पर्यावरणाला काहीही धोका नाही अशी हमी कंपनीने लेखी स्वरुपात द्यावी.

**श्री नंदा, प्रकल्प प्रवर्तक यांनी सर्व उपस्थित सूचना, आक्षेपांना उत्तर देताना** सांगितले की उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी ज्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित केले, त्याबद्दल धन्यवाद.

प्रथम अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितल्याप्रमाणे प्रकल्प किती क्षेत्रफळात होईल, कुठले भूखंड बाधित होतील व प्रकल्पाचा फायदा काय हे स्थानिकांनी मुद्दे उपस्थित केले. तर त्यासाठी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, कार्यकारी सारांश अहवाल आम्ही प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघातील ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेल्या होत्या. त्याचप्रमाणे स्थानिकांना व ग्रामपंचायत कार्यालयास प्रस्तावित प्रकल्पाविषयी जी माहिती लागेल, ती उपलब्ध करण्यात येईल. तसेच एखाद्या व्यक्तीस जर स्पष्टीकरण हवे असल्यास तेही देण्यात येईल.

१) बैठकीत पहिला मुद्दा पाण्याबाबत उपस्थित करण्यात आलेला आहे. स्थानीक शेतक-यांनी भिती व्यक्ती केली की प्रकल्पात पाणी वापरल्याने त्यांनी पिण्याचे पाणी मिळणार नाही, तसेच त्यांना पिकांसाठी कमी प्रमाणात पाणी उपलब्ध होईल.

   तर सदरहू प्रकल्पात पाणी हे वर्षातून एकदाच घेण्यात येते. तेच पाणी वरच्या व खालच्या पाणीसाठ्यात (reservoir) जाते. एकदा पाणी घेतल्यानंतर प्रकल्पासाठी पाण्याची सारखी गरज नसते. प्रकल्पासाठी आम्ही मान्सूनमध्ये पाणी घेणार आहोत, जेव्हा पावसाचे दिवस असतात आणि नद्यांमध्ये अतिरिक्त पाणी उपलब्ध असते व ते पाणी वाहून जाते. आम्ही जुलै ते सप्टेंबरमध्ये जेव्हा पावसाचे दिवस असतात. तेव्हाच घेण्यात येईल. पहिल्या वर्षी तसेच



Scanned with OKEN Scanner

घेण्यात येईल. प्रकल्पात बाष्पीभवन होण्याचे प्रमाणे अत्यल्प असेल. तरी आपल्या वापरासाठी उपलब्ध पाण्याचा आम्ही उपयोग करणार नाही. जे पाणी वरील डॅममध्ये येईल, तेच खालच्या पाणीसाठ्यात सोडण्यात येईल. तरी स्थानिकांना जे पाणी पिकांसाठी, पिण्यासाठी, घरगुती वापरासाठी पाणी उपलब्ध आहे, त्यावर कुठलाही परिणाम होणार नाही. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र राज्य या सर्व बाबींचा विचार करुनच आम्हांला पाणी घेण्याची परवानगी देईल. त्यामुळे प्रकल्पासाठी लागणा-या पाण्यामुळे आपणास त्रास होणार नाही.

२) पुढचा मुद्दा स्थानिकांनी उपस्थित केला तो जमीन अधिग्रहणाबाबत. तर आम्हांला कोणकोण्त्या ठिकाणी किती जमीन लागेल त्याबाबतची प्रस्तावित योजना (Proposed Plan) आम्ही उपलब्ध करुन दिलेला आहे. पर्यावरण जाहिर जनसुनावणीनंतर त्या जमिन/भूखंडाबाबत डिमार्केशन करुन प्रकल्प बाधित व्यक्ती/कुटुंबे यांची माहिती तयार करण्यात येईल. जमिनीचा मोबदला हा प्रत्यक्ष प्रकल्प बाधित व्यक्ती/कुटुंबाबरोबर चर्चा करुनच अदा करण्यात येईल. जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मोबदला सर्व प्रकल्प बाधितांना अदा करण्यात येईल. जमिन अधिग्रहण कायद्यानुसारच मोबदला ठरल्यानंतर त्यापेक्षा जास्त रक्कम अदा करण्यात येईल. सदरहू व्यव्हार हा जिल्हाधिकारी यांच्या समोर त्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येईल.

तसेच पुनर्वसनाबाबत राज्य शासनाने पारित केलेल्या निर्देशांनुसारच संबंधित प्रकल्प बाधित व्यक्ती/कुटुंब यांना विश्वासात घेऊनच करण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

३) पुढील मुद्दा प्रकल्पातील रोजगाराबाबत उपस्थित करण्यात आलेला होता. प्रकल्पात रोजगार हा बांधकाम टप्प्यात, नंतर प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर उपलब्ध होऊ शकतो.

४) प्रकल्प कार्यान्वित होण्याच्या वेळेस स्थानिकांना प्रकल्पात रोजगार मिळण्यासाठी सक्षम करण्यासाठी आम्ही कौशल्य विकास केंद्र (Skill Development Centre) सुरु करणार आहोत. परिसरातील युवक, युवतींना कौशल्य प्रशिक्षण देण्यात येईल, जेणेकरुन परिसरातील युवक, युवती या प्रकल्पात किंवा अन्य ठिकाणी काम करण्यास सक्षम होतील. सदरहू कौशल्य विकास केंद्र (Skill Development Centre) प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतरही चालू ठेवण्यात येईल,

जेणेकरुन परिसरातील युवक युवतींनी इतर ठिकाणी रोजगार करण्यास सक्षम करण्यात येईल.

५) सदरहू प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर स्थानिक अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल उदा – पायाभूत सुविधांसाठी / प्रकल्पासाठी स्थानिक गाड्या भाड्याने घेणे, प्रकल्पातील रस्ते तयार करणे, कॅन्टीन चालविणे, प्लबिंग, विद्युत कामे ही स्थानिकांनाच देण्यात येतील.

६) पुढील मुद्दा वनविभागातील जमिनीबाबत उपस्थित करण्यात आला. वनविभागाची जमीन ही भारत सरकारच्या नियम, निर्देशांप्रमाणेच दिली जाते. वनविभागाची जेवढी जमिन अधिग्रहित करण्यात येते, तेवढ्या क्षेत्रफळाची जमिनीत वन निर्मिती करणे बंधनकारक आहे. तसेच प्रकल्पाच्या जवळील वनविभागाच्या जमिनीत हरित पट्टा विकसित करावाच लागतो. त्याचा फायदा स्थानिकांना मिळण्यासाठी ते करावे लागते. जर तशी जमीन मिळाली नाही, तर



Scanned with OKEN Scanner

राज्यात कुठेही खाजगी जमीन शासनाकडून वर्ग करण्यात येते, त्याठिकाणी शासनाच्या निर्देशांनुसार वनविकास करावा लागतो.

७) पुढील मुद्दा नदीमध्ये कमीतकमी पर्यावरणीय प्रवाह (Minimum Environmental Flow) राखण्यात येईल काय?
तर त्यास उत्तर आहे आम्ही नैसर्गिक नदीप्रवाह थांबवत नाही. आम्ही मोसमी नाल्यातून वरच्या पाणीसाठ्यात पाणी साठवणार आहोत. आम्ही नदीतील प्रवाहात अडथळा आणणार नाही. तसेच कमीतकमी पर्यावरणीय प्रवाह (Minimum Environmental Flow) ही संकल्पना नदीवर बांध टाकलेल्या प्रकल्पासाठी लागू होते. ती संकल्पना आमच्या प्रकल्पास लागू होत नाही.

८) असाही मुद्दा उपस्थित करण्यात आला की प्रथम प्रकल्प सुरु करताना सर्व आश्वासने देण्यात येतात, नंतर त्याची काहीही अंमलबजावणी करण्यात येत नाही. तर यास स्पष्टीकरण देण्यात येते की य जनसुनावणीची व्हिडिओ, ऑडिओ व लेखीस्वरुपात अहवाल तयार करण्यात येतो. सदरहू मागण्या अटी व शर्तीच्या स्वरुपात पर्यावरण अनुमती (Environmental Clearance) प्रदान करताना प्रकल्प प्रवर्तकांना पारित करण्यात येतात व दर सहा महिन्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व केंद सरकारचा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय त्यावर देखरेख ठेवण्यासाठी पाहणी करत असते. पर्यावरण व्यवस्थापन योजना (Environment Management Plan) करताना दिलेल्या वचननाम्यानुसार पर्यावरण योजना व त्यासाठी लागणारा खर्च याबाबत पाहणी करण्यात येते. तर प्रकल्प व्यवस्थापन प्रकल्प बांधकाम टप्प्यात असल्यापासून करण्यात आलेल्या वचननाम्यानुसार सर्व माहिती स्थानीक ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात येतील.



Scanned with OKEN Scanner

९) पुढील मुद्दा — प्रकल्पा बांधकामामुळे परिसरात दुष्परिणाम होतात. तर प्रकल्प बांधकाम टप्प्यात असतांना काही पर्यावरणावर आघात होतात, तर ते कमी करण्यासाठीच पर्यावरण व्यवस्थापन योजना आखल्या जातात व त्याची अंमलबजावणी करण्यात येते. बांधकाम टप्प्यात धुळीचे प्रदूषण न होण्यासाठी वेळोवेळी पाणी शिंपडणे, कंपनीत येणा-या वाहनांवर नियंत्रण ठेवणे असे विविध निर्देश पाळण्यात येतात व त्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ देखरेख ठेवत असते. त्याची माहिती ही स्थानिक ग्रामपंचायतींना उपलब्ध करण्यात येईल.

१०) मात्र या प्रकल्पाचा भविष्यातील काळात बराच मोठा फायदा होतो. उदा. — दोन पाणी साठवण जलाशयामुळे परिसरातील वॉटर बॅलन्स पाळला जातो, humidity पाळली जाते. भूगर्भातील पाण्याची पातळी ही वाढते. तरी इतर प्रकल्पापेक्षा अशा प्रकल्पांना पर्यावरणाच्या दृष्टीने योग्य प्रकल्प असे म्हटले जाते. बांधकाम टप्प्यात जो काही पर्यावरणावर आघात होतो, तो कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येतो.

११) पुढील मुद्दा बांधकाम टप्प्यात विविध ठिकाणेच कामागार काम करण्यास येतात. त्यामुळे परिसरात आरोग्याचे विविध मुद्दे उपस्थित होतात. आमच्या प्रकल्पाचे धोरण आहे की बांधकाम टप्प्यातही स्थानिक कामगारांना प्राधान्य देण्यात येते. तसेच प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर स्थानिकांना व त्यातही प्रथम प्रकल्प बाधित स्थानिकांनाच ज्यांच्या जमिनी अधिग्रहित करण्यात आल्या, त्यांना प्राधान्य देण्यात येईल. त्यावेळेस प्रकल्पातील गरज, शैक्षणिक अर्हता, कामाची गरज लक्षात घेऊनच स्थानिकांना रोजगाराची संधी देण्यात येते. त्यानंतरच migrant workers चा विचार करण्यात येतो. migrant workers नियुक्त करताना प्रथम त्याची वैदकीय



Scanned with OKEN Scanner

तपासणी करण्यात येते तसेच वेळोवेळी तपासणी करण्यात येते की जेणेकरुन त्याच्या आरोग्यामुळे इतर कामगारांना त्याचा त्रास होवू नये.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी पूर्ण झाल्यानंतर प्रकल्प बांधकाम टप्प्याअगोदर आम्ही प्रकल्पबाधित गावांमध्ये आरोग्य शिबिर दर तीन महिन्यांनी आयोजित करणार आहोत. त्यामध्ये गरजु रुग्णांसाठी मोफत औषधे पुरविण्यात येतात. आरोग्यशिबिर प्रकल्प बाधित प्रत्येक गावात आयोजित करण्यात येते.

१२) या प्रकल्पात उर्जा (Energy) साठवण करण्यात येते. या प्रकल्पात पाठिंबा देण्यासाठी सौर उर्जा (solar energy ) व वायू उर्जा (wing energy) तयार करण्यास शासन प्रयत्नशील आहे. तर या प्रकल्पाची गुंतवणूक ९,५०० कोटी आहे, तर या प्रकल्पामुळे इतर प्रकल्पांना येथे गुंतवणूक करण्यासाठी चालना मिळेल.

त्यांनी सांगितले की उपस्थित प्रश्न, आक्षेप यांना उत्तर देण्यात आलेली असून एखादा राहिला असल्यास वा दुसरी सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत.

१५) **श्री विशाल शरदराव बोरसे, राहणार-वाडी सुतोंड, तालुका-सोयंगाव,जिल्हा-छत्रपती संभाजीनगरः-**

प्रकल्प प्रवर्तकांनी जरी विविध मुद्द्यांवर स्पष्टीकरण दिलेले आहे, तरी प्रकल्पामुळे परिसरात तापमानात वाढ होईल याबाबत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही.

तसेच दुसरा मुद्दा प्रकल्पासाठी काही जमिनी अधिग्रहित करण्यात येतील. मात्र प्रकल्पास लागून ज्या जमिन आहेत,त्या जमीनीवर या प्रकल्पाचा काय दुष्परिणाम होईल याबाबत स्पष्टीकरण.



Scanned with OKEN Scanner

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की तापमान व हवामान बदल मुद्द्यांबाबत आपण आक्षेप नोंदिवला आहे. तर तापमान व हवामान बदल हा जागतिक प्रश्न झालेला आहे. या एका प्रकल्पामुळे त्यावर मोठ्या प्रमाणात आघात होणार नाही. सदरहू प्रकल्पामुळे बांधकाम टप्प्यात पर्यावरणावर आघात होतो. त्यासाठी विविध उपायांनी तो कमी करण्यात येतो. मात्र त्यानंतर या प्रकल्पासाठी जी पाण्याची साठवण तलाव (reservoir) तयार करण्यात येतील, त्यामुळे होणारी humidity, भूगर्भातील पाण्यात वाढ ही चांगल्या पर्यावरणसाठी उपयुक्त आहेत. आम्ही ५०० हेक्टर जमिन घेत असुन त्यातील ३५० हेक्टरमध्ये पाण्याची साठवण तलाव (reservoir) तयार करण्यात येतील, ते पर्यावरण संवर्धनासाठी उपयुक्त होणार आहेत. उर्वरित १५० हेक्टरमध्ये बांधकाम करताना त्यात रस्ता करताना हरित पट्टा विकसित करण्यात येईल.

दुस्रा मुददा प्रकल्पास लागून असलेल्या जमिनीवर काय दुष्परिणाम होतील? तर जी प्रकल्पास लागून जमिन आहे (adjoining land),त्यावर काही दुष्परिणाम झाल्यास त्याबाबत मोबदला देण्यात येईल. जर संबंधित व्यक्ती जमिन देण्यास तयार असेल, तर ती प्रकल्पासाठी विकत घेण्यात येईल. जर तो तयार नसेल, तर त्याचप्रमाणे त्या जमिनीत जर पिके असतील, तर त्यास वर्तमान नियमांप्रमाणे मोबदला देण्यात येईल. त्या जमिनीचे पुनर्वसन करण्यात येईल व ती पूर्वीच्या स्थरावर आणून देण्यात येईल. जर जमिनीचे पुनर्वसन नाही झाले, तर बाधित कालावधीची नुकसान भरपाई देण्यात येईल. जर नुकसान जास्त झालेले असेल, तर जरीही प्रकल्पास जमीनीची गरज नसतानाही ती बाधित जमीन विकत घेण्यात येईल.

१६) **श्री मंगेश ---------------------, राहणार---**

प्रकल्पासाठी प्रकल्प परिसरात जी काही जंगल तोड करण्यात येईल, त्याची भरपाई महाराष्ट्रात दुस-या ठिकाणी करण्यात येईल. तर जंगल आमच्या गावातील/परिसरातील, पण त्याची भरपाई ही महाराष्ट्रात दुस-या ठिकाणी असे का?

यावेळी अध्यक्ष यांनी मत मांडले की संबंधित व्यक्तीचे असे मत आहे, जंगलतोड येथे करणार असून ती भरपाई करण्यासाठी दुसरीकडे जमीन घेऊन त्यावर हरित पट्टा विकसित करणार आहात, तर तसे करु नये. त्यांची विनंती आहे की परिसरातीलच भूखंड घेऊन तेथे हरितपट्टा विकसित करण्यात यावा.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की तो भूखंड हा वन विभागाने मंजूर करणे बंधनकारक असते आमचाही प्रयत्न असतो की परिसरातच हरित पट्टा विकसित करण्यात यावा. मात्र याठिकाणी वनविभागाची मान्यता ही महत्वाची असते.

**<u>१६) श्री नितीन बबनराव बोरसे, राहणार-वाडी, तालुका-सोयगाव, जिल्हा-छत्रपती संभाजीनगरः-</u>**

मी खूप दिवस बघत आहे की अधिकारी पाहणीस येतात, शेतकरी येतात. तर सदरहू प्रकल्पामुळे परिसरात कुठलाही दुष्परिणाम होत नसेल आणि या प्रकल्पामुळे परिसरात फायदा होत असेल, या भागास व महाराष्ट्राला वीज मिळणार असेल, तर हा प्रकल्प येथे होण्यास हरकत नाही. मात्र आमची एक मागणी आहे की परिसरात तरुण-तरुणी हे मोठ्या प्रमाणात बेरोजगार आहेत. त्यांना वाटते की आमचे मंजूर कोट्याचे पाणी जाणार, तापमान वाढणार, तर त्यांना कंपनी प्रशासनाने भेट देऊन प्रकल्पाविषयी सर्व माहिती सांगण्यात यावी. स्थानिकांमध्ये प्रकल्पाविषयी जनजागृती होणे आवश्यक आहे.



Scanned with OKEN Scanner

**१७) श्री सुजित ढोलम, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती -**

उपस्थित नागरिकाने चांगला प्रश्न विचारला की वृक्षतोड जर येथे होणार असेल, तर त्याची भरपाई ही येथे का होणार नाही? तर माझी प्रकल्प प्रवर्तकांना अशी विनंती आहे की जर वन विभागाच्या क्षेत्रात वनतोड (deforestation) होणारच आहे, तर प्रकल्पासाठी जी खाजगी जमीन अधिग्रहित करणार आहात, तर त्यावर वृक्षारोपण करण्याबाबत नियोजन याची माहिती द्यावी. पर्यावरण अनुमती प्रदान करताना शासन वनविभाग क्षेत्रातील वृक्षतोड व खाजगी अधिग्रहित जमीनीवर हरित पट्टा विकसन याबाबत अटी व शर्ती लागू करेल, त्याबाबत नियोजन.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की पर्यावरण अनुमतीमध्ये पारित केलेल्या अटी व शर्तीनुसार प्रकल्पाच्या क्षेत्रात (inside of the project area) हरित पट्टा विकसित करण्यात येईल.

**१८) श्री पाटील, ग्रामपंचायत सदस्य, बनोटी, तालुका-सोयगाव, जिल्हा-छत्रपती संभाजीनगरः-**

आपण ४४८ हेक्टर जमिन अधिग्रहणाबाबत दिलेली आहे. तर आपण सर्व जमिन अधिग्रहित करणार वा त्यातील काही जमीन अधिग्रहित करणार आहात? आपण जो नकाशा दिलेला आहे, मी पदवीधर असूनही मला तो समजला नाही. आमचे छोटेसे गाव आहे नायगांव. लोकांमध्ये भिती आहे की सर्व गाव हे अधिग्रहित करण्यात येईल, किंवा नायगावचा काही भाग कंपनीकडूव अधिग्रहित करण्यात येईल. तरी आपला प्रकल्प नकाशाची माहिती बैठकीत सांगण्यात यावी. त्याचप्रमाणे जी बाधित कुटुंबे आहेत, त्या सर्वांचीच जमिन अधिग्रहित करणार काय आणि तिसरा मुद्दा आपण वर्षातून एकदाच पाण्याची साठवण करणार, ते पाणी आपण जमिनीतून झिरपून देणार



Scanned with OKEN Scanner

नाही. तर त्या पाण्याचा जर स्थानिकांना फायदाच होणार नसेल, तर प्रकल्पाचा आम्हांला काहीही फायदा नाही.

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की साठवणीतील पाणी हे झिरपून देण्यात येणार नाही. कारण ते झिरपून दिले तर आमचे वीज वितरण होणार नाही. मात्र अगदी नगण्यस्वरुपात पाणी हे जमिनीत झिरपले जाईल. तरी वर्षात मान्सून मोसमात आम्ही त्या पाण्याची साठवण करु.

प्रकल्पात नोकरीच्या संधि प्रथम ज्यांनी जमिन अधिग्रहित करण्यात आली, त्यांनाच देण्यात येईल. तर त्यांच्याकडे असणार शैक्षणिक अहर्ता व प्रकल्पातील गरज लक्षात घेऊन त्यांना प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात येईल.

त्यांनी सांगितले की बैठकीत प्रकल्प नकाशाची माहिती देता येईल, मात्र आमची अशी इच्छा आहे की जनसुनावणी संपल्यानंतर सरपंच व गावातील ग्रामपंचायत सदस्य यांची समिती स्थापून त्यांना प्रकल्पाची संपूर्ण माहिती ही प्रकल्प स्थानावर देण्यात येईल.

त्यांनी सांगितले की प्रकल्पाच्या बांधकाम टप्प्यासाठी जी खाजगी जमिन अधिग्रहित करण्यात येणार आहे, ती प्रकल्प उभारणी झाल्यानंतर योग्य असल्यास परत करण्यात येते. प्रकल्पात दोन पाणी साठवण तलाव (reservoir) आहेत, तर नायगाव गाव खूप दूर असून नायगाव हे बाधित होणार नाही.

१९) **<u>डॉ. टी.पी. पाटील, शिक्षण अधिकारी, -</u>**

माझी पूर्ण जमिन वडोद धरणाखाली आहे आणि प्रकल्प प्रवर्तक म्हणतात की पाण्याचा एकही थेंब झिरपून देणार नाही. तर सदरहू प्रकल्प आम्ही होऊ देणार नाही, कारण जे आमच्या वडोद धरणात पाणी आहे, त्यामुळे एक हजार एकर जमीन ही सिंचित होत आहे. प्रकल्पासाठी जे पाणी



Scanned with OKEN Scanner

साठवण करणार आहात (water reservoir), त्यावर आमचा आक्षेप आहे. त्यातील एक थेंबही खाली मिळणार नाही. पावसाळ्यात काही अडचणी आल्या, तर लोकांना प्यायला पाणी राहणार नाही. वडोद डॅमच्या कॅचमेंन्ट क्षेत्रात प्रकल्प होणार आहे. वडोद डॅममधून काही गावांना पाणी पुरवठा होतो. ते पाणी कमी झाले, तर प्यायल पाणी मिळणार नाही. प्रकल्पास आमचा विरोध आहे. त्याशिवाय दुस-या water reservoir ला येणारे पाणी हे डोंगरापासून गोंदेगावपर्यंत नदीला पाणी राहणार नाही.

आता शेतक-यांच्या मुलांना नोकरीचा मुद्दा. या शेतक-यांच्या मुलांना जास्तीतजास्त वॉचमन म्हणून नोक-या मिळतील, बाकी काहीही मिळणार नाही. मी औरंगाबादला राहणार आहे, तेथील सर्व प्रकल्प पाहिलेले आहेत. ज्या शेतक-याच्या जमिनी घेतल्या, त्यांची मुले तेथे गेटकीपर आहेत. कंपनीने कंपाऊंड बांधले, तर आत जाण्यासही स्थानिकांना परवानगी मिळणार नाही. त्याशिवाय जर शेतकरी जमिन देणार असेल, तर माझे काहीही म्हणणे नाही.

तरी हा प्रकल्प आमच्या भागात होऊ देणार नाही.

**<u>२०) श्री राणा देवबा साबळे, राहणार-गट नं. ६५, जंगली कोठा शिवार, तालुका-सोयगाव, जिल्हा-छत्रपती संभाजीनगर:-</u>**

माझे लाभार्थी यादीमध्ये नांव आहे. सदरहू प्रकल्पामुळे किती लाभ होणार आहे वा किती नुकसान होणार आहे हा विचार करण्यापेक्षा प्रत्येकाच्या आयुष्यात प्रकाश केव्हा येईल याचा विचार व्हावा. जर या प्रकल्पामुळे काही गोष्टी चुकीच्या होणार असतील, तर बोरवा, कादा, बनोटी, किरगा हे पाचो-याला येऊन मिळतील व पाचो-या सारखे येथे मोठे सेंटर होणार आहे. कारण हा भारतातील नं. २ चा प्रकल्प आहे की जो आपल्या भागातच होत आहे

जायकवाडी धरणातील नाथ सागर येथील कितीतरी लोकांनी, शेतक-यांनी त्याग केला, त्याच्या जमीनी गेल्या, त्याग केल्यानेच लाखो लोकांचा

फायदा झाला, त्याग केल्यानेच काहीतरी मिळत असते. आम्ही सुखी झालो नाही, तरी आमच्या पुढील पिढ्या सुखी व्हाव्यात असा सकारात्मक विचार असेल तर होईल. चार हजार लोकांना काम मिळणार आहे. तर एक माणसाच्या कुटुंबात पाच लोक जरी धरले, तरी वीस हजार लोकांचा समुदाय येथे होणार आहे. त्यांच्यामुळे येथील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होणार आहे, कारण त्यांना दुकाने लागतील, औषधांची दुकाने लागतील, हॉस्पीटल लागतील, गॅरेजेस लागतील, शाळा, महाविद्यालये लागतील. नेवासा, राहुरी, शिर्डी यासारखे बिझनेस हब परिसरात निर्माण होण्याची संधी आहे.

तरी माझी विनंती पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आहे की जरी या प्रकल्पाने चांगलेच होणार असेल, तर हा प्रकल्प दुसरीकडे जाऊ देऊ नये. मात्र ज्या शेतक-यांच्या जमिनी अधिग्रहित होणार आहेत, त्यांना त्या पटीने फायदा देण्यात यावा. त्यांच्या मुलांना नोक-या देण्यात याव्यात, त्याचप्रमाणे शैक्षणिक अहर्ता असेल, त्याप्रमाणे प्रकल्पात रोजगाराची संधी देण्यात यावी. मी प्रकल्प संचालक मंडळाचे स्वागत करतो.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे मत मांडले की प्राथमिक स्वरुपात सर्व ग्रामस्थांनी, नागरिकांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी आपल्या सूचना, विचार, आक्षेप नोंदविलेले आहेत. तसेच लोकप्रतिनिधीनी सुध्दा आपले विचार मांडलेले आहेत. त्यांनी स्थानिक आमदारांना लोकसुनावणी संदर्भात विचार उपस्थित करण्याची विनंती केली.

२१) **<u>मा. आमदार उदयसिंग राजपूत -</u>** मी खेडगावात जन्मलो, मला खेडेगावची मानसिकता समजते. तर स्थानिकांना मी सांगतो की आपण परवानगी दिल्याशिवाय हा प्रकल्प होणार नाही. प्रकल्प मंजूरी व स्थापनेसाठी दीड-दोन वर्षे लागतील. प्रकल्पासाठी वन क्षेत्रातील जमिन लागत असेल,



Scanned with OKEN Scanner

तर त्या असा नियम आहे की समजा त्यांनी एक हजार एकर ज़मिन घेतली, तर त्यांना दुस-या ठिकाणी दीड दोन हजार एकर जमिनीवर वृक्षारोपण करावे लागते. तरी माझी प्रकल्प प्रवर्तकांना सूचना आहे की वन क्षेत्रातील जमिन अधिग्रहणाच्या बदल्यात कन्नड तालुक्यातच हरितपट्टा विकसनासाठी जमिन अधिग्रहित करण्यात यावी, कन्नड तालुक्याच्या बाहेरील जमीन घेऊ नये. स्थानिकाच्या इच्चेशिवाय कंपनी कोणाचीही जमीन घेऊ शकत नाही. त्याचप्रमाणे प्रकल्पात अधिका-यांपासून ते कर्मचा-यापर्यंत ९५% लोक हे येथील स्थानिक परिसरातीलच असतील. तांत्रिक व वरिष्ठ अधिकारी संवर्गात आपण ५% लोक बाहेरील प्रदेशातील आहे.

मा. आमदार यांनी सांगितले की अशा पध्दतीचा प्रकल्प भारतात तिस-या क्रमांकाचा आहे, महाराष्ट्रातील हा पहिला प्रकल्प आहे. जर स्थानिकांनी सहकार्य केले, तर आपला पहिला नंबर लागेल, अन्यथा आपण मागे पडू. या प्रकल्पामुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड वाढ होईल. हा प्रकल्प पाहण्यास महाराष्ट्रातील लोक येतील. येथे कमीतकमी १००-२०० गाडया या प्रकल्पात येऊ शकतात.

मा. आमदार यांनी मत मांडले की माझे असे म्हणणे नाही की प्रकल्पास मान्यता द्यावी, तर भविष्यात हा प्रकल्प येथे सुरु व्हावा

मा. आमदार यांनी प्रकल्प व्यवस्थापनास सूचना केली की परिसरातील सर्व लोकांशी समन्वय साधून त्यांना प्रकल्पाविषयी सर्व माहिती सांगण्यात यावी. तसेच १५-२० लक्झरी गाड्यातून स्थानिकांना असा प्रकल्प भारतात कोठे कार्यरत आहे, तेथे दाखविण्यास नेण्यात यावे. त्यांच्या मनातील भिती व शंका यांचे निरसन करण्यात यावे. कन्नड मतदारसंघाचा प्रकल्पास १००% पाठिंबा आहे. मात्र प्रकल्प व्यवस्थापनाने स्थानिकांना विश्वासात घ्यावे, त्याचप्रमाणे स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्याची हमी द्यावी. तरी या

प्रकल्पाचा सकारात्मक विचार करण्यात यावा. जर स्थानिकांना नकारात्मक विचार केल्यास तसाच अहवाल शासनास सादर करण्यात येईल.

जर प्रकल्प सुरु झाला, तर आपल्या येथून ४-५ जिल्ह्यांना वीज मिळेल. मात्र मी स्थानिकांबरोबर आहे. त्यांची इच्छा असेल, तरच प्रकल्प होईल. तरी जेथे असा प्रकल्प आहे, त्याठिकाणी स्थानिकांना भेट देण्यास नेण्यात यावे. त्यांचे गैरसमज दूर करण्यात यावेत.

**<u>२२) श्री महेन्द्र प्रल्हाद पाटील, स्थानिक-</u>**

जे ६८ टीएमटी पाणी या प्रकल्पासाठी देणार आहात, तर खालील पाणीसाठा तलावात (reservoir) किती पाणी येईल? वाडीचा जो मध्यम प्रकल्प आहे, तो भरल्यानंतर खाली पाणी येते. त्यावर ५-६ गावे अवलंबून आहेत. त्याच्यानंतर त्या गावांना पाणी येणारच नाही, तर त्यांनी पाण्याचा प्रश्न कोठुन मिटवायचा? कारण त्यांनी दुसरी नदी नाही. प्यायला पाणी उरणार नाही, तर सिंचनासाठी पाणी कोठून आणणार?

दुसरा प्रश्न या प्रकल्पांतर्गत जी विकास कामे होणार आहेत, ती कोणती कामे होतील याबाबत स्पष्टीकरण. कारण असा अनुभव आहे की प्रकल्प झाल्यानंतर तेथे विकास कामे ही अत्यल्प प्रमाणात होते. तरी कंपनीने एक परिपत्रक काढावे की विशिष्ट गावात विशिष्ठ कामी हाती घेण्यात येतील याची माहिती द्यावी. जर अवलंबून गावात पाणी मिळालेच नाही, तर कंपनी काय उपाययोजना अंगिकारणार आहात.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकाचा समारोप करण्याची विनंती केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकाचा समारोप करताना सांगितले की बैठकीत उपस्थितांना केलेल्या सूचना, आक्षेप



Scanned with OKEN Scanner

यावरुन असे दिसते की जनता ही पर्यावरण संरक्षण, हवामान, तापमानातील वाढ याबाबत जागरुक झालेले आहेत. माझे असे मत आहे की, उपस्थित नागरिकांनी प्रकल्पाच्या अनुषंगाने ज्या शंका उपस्थित केल्या आहेत, त्यांचे निरसन होणे गरजेचे आहे. केवळ एकाच दिवशी सादरीकरणाच्या माध्यमातून सर्व बाबी समजुन घेणे शक्य नाही. तरी प्रकल्पाचे फायदे-तोटे, प्रकल्पाविषयीचा सविस्तर प्रस्तावित आराखडा संबंधित ग्रामपंचायतीकडे सुपूर्द करण्यात यावा. जेणेकरुन प्रकल्पाविषयी सविस्तर माहिती नागरिकांना कळू शकेल. येथे मोठ्या संख्येने लोक उपस्थित राहिले व प्रस्तावित प्रकल्पाविषयी सर्व शंका, विचार, सूचना आक्षेप नोंदविले, त्याबद्दल प्रशासनातर्फे आभार मानतो.

सुरवातीलाच आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ही जनसुनावणी आपले विचार, सूचना, टीकाटिप्पणी यांची नोंद घेण्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून येथे कोणताही निर्णय घेण्यात येत नाही. उपस्थितांनी योग्य प्रकारे सूचना, आक्षेप नोंदविलेले आहेत. तरी सर्वांचे आभार.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे आभार मानून मा. अध्यक्ष यांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.



Scanned with OKEN Scanner

सोबत प्राप्त झालेले ५ लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडत आहोत.

**(डॉ. प्रकाश प्र. मुंडे)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
छत्रपती संभाजीनगर

**(सुजीत ढोलम)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
छत्रपती संभाजीनगर

**(जनार्दन विधाते)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर
जिल्हा - छत्रपती संभाजीनगर



Scanned with OKEN Scanner